ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]  [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ]  [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 302-M (RS)**

**Code No. : 302-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ಪ್ರಥಮ ವರ್ಷ

# D.El.Ed. FIRST YEAR

ಶಿಕ್ಷಣ

**EDUCATION**

# ಮೂಲ ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳ ಪರಿಚಯ

# INTRODUCTION TO BASIC CONCEPTS

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)

( Marathi Version )

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 13. 12. 2018 ]

Date : 13. 12. 2018 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ]  [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ]  [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**भाग - I**

खालील प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी अति योग्य उत्तराची निवड करा आणि उत्तर-पुस्तकेमध्ये उत्तर लिहा. सर्व प्रश्न सोडविणे सक्तीचे आहे : $10 \times 1 = 10$

1. खालीलपैकी हा एक रचनावादीय अध्यापन-अध्ययन कृतीचा गुणधर्म नाही.

   (A) समस्या निराकरण, उच्च श्रेणीतील विचार कौशल्यावर भर देण्यात झाला

   (B) ध्येये आणि उद्दिष्ट्ये फक्त शिक्षकाने साधीत केली

   (C) विद्यार्थ्यांनी घडवून आणली आणि अध्ययन नियंत्रित केले

   (D) शोधणे ही अधिक अनुकूल पद्धत आहे.

2. समावेशक शिक्षणामध्ये खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

I. प्रत्येक विद्यार्थी मुख्य आहे आणि त्याना अद्वितीय गरजा आणि प्रतिभा असते

II. सर्व विद्यार्थी अध्ययन करू शकत नाहीत

III. समुदायाचा समावेश शिक्षणामध्ये समाविष्ट असल्यामुळ काही फरक पडत नाही

IV. शिक्षणाचा हक्क हा सर्व मुलांचा मुलभूत हक्क आहे.

**यापैकी हे बरोबर आहे :**

(A) I आणि IV (B) II आणि III

(C) II आणि IV (D) I आणि III.

3. धन आणि शक्ती यामधील विविधता म्हणजेच जाती विविधता यानी दर्शविण्यासाठी समाजशास्त्रज्ञाने वापरलेले शब्द हे आहेत.

(A) सांस्कृतिक आणि आर्थिक स्थान (B) सामाजिक-राजकीय स्थान

(C) सामाजिक-आर्थिक स्थान (D) सांस्कृतिक भावनात्मक स्थान.

4. भारताच्या घटनेचे दुरुस्ती विधेयक प्रत्येक मुलाला शिक्षणाच्या हक्काची खात्री देते. ते हे आहे

(A) 74 वा दुरुस्ती विधेयक (B) 75 वे दुरुस्ती विधेयक

(C) 86 वे दुरुस्ती विधेयक (D) 84 वे दुरुस्ती विधेयक.

5. साधना परिक्षेचे हे एक उदाहरण आहे

(A) कांदबरीच्या स्वरूपातील नमुने बनविणे (B) पोर्ट फोलीओ

(C) वाचलेली माहिती लिहिणे (D) आर्लेपियड ( Olympiads ).

6. NCF 2005 नुसार शाळेतील विविधता आणि शैक्षणिक समावेशा संबंधीत अभ्यासक्रम विकास आणि सुधारणामध्ये

(A) अध्ययनामध्ये पाठीमागे पडलेल्या मुलासाठी विशेष वर्ग घेणे

(B) पाठ्यपुस्तक संस्कृतीपासून दूर जाऊन सर्व विद्यार्थ्यांना अर्थपुर्ण अनुभव पुरविण्याचा प्रयत्न करणे

(C) प्रतिभावंत मलांना विशेष शिक्षण पुरविणे

(D) ग्रामीण मुलाना गुणवत्तेचे शिक्षण पुरविणे.

7. घटनेच्या 21A कलमामध्ये सुचविलेले मुद्दे कोणते ?

(A) 6-14 वर्षाच्या वयोगटातील मुलांसाठी शिक्षण हा मुलभूत हक्क आहे.

(B) प्राथमिक स्थरावरील शिक्षणाच्या भाषिक अल्पसंख्यांक गटात येणाऱ्याना मातृभाषेतून अध्ययनाची सुविधा पुरविणे

(C) पूर्णपणे राज्य बाह्य निधी राखणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थामध्ये कोणत्याही धार्मिक सुचना पुरवू नये

(D) भारतामध्ये सार्वभौमत्व, एकता आणि एकात्मता वाढविणे आणि सुरक्षित ठेवणे.

8. शाळा पद्धतीत सामुदायिक मालकीने मुलभूत शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्याचा भारतातील प्रमुख योजना कायक्रम हा आहे.
   (A) जिल्हास्तरीय प्राथमिक शिक्षण कार्यक्रम
   (B) नली-कली
   (C) पढे भारत बढे भारत कार्यक्रम
   (D) सर्व शिक्षण अभियान.
9. एक मुल खेळणे टाकते, ते पालकानी उचलून देईपर्यंत थांबते आणि पुन्हा ते खाली टाकते. हे यांचे उदाहरण आहे.
   (A) हाताळण्याचा खेळ (B) चिन्हांचा खेळ
   (C) नाटकी ( नाटकयुक्त ) खेळ (D) व्यक्त करण्याचा खेळ.
10. शिक्षणाला समवर्ती यादीत घेण्याकरिता कोणते घटना कलम करण्यात आले ?
   (A) कलम 350A (B) कलम 256
   (C) कलम 51(1) (D) कलम 28.

## भाग - II

खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये : $5 \times 2 = 10$

11. रचनावादीय अध्यापन-अध्ययन कृतीच्या चार गुणधर्मांचे वर्णन करा.
12. समावेशक शिक्षणामधील दृष्टीकोनाच्या चार बदलाची यादी करा.
13. व्यवसायिक शिक्षकांचा अर्थ कोणता ?
14. शिक्षक या नात्याने तुमच्या वर्गखोलीतील प्रतिभावंत मुलांना तुम्ही कसे ओळखाल ? चार पद्धतींचे वर्णन करा.
15. DPEP कार्यक्रमाचे मुख्य उद्देश कोणते ?
16. मुलाच्या भावनिक विकासामधील खेळाच्या महत्वांचे वर्णन करा.
17. बहुश्रेणी अध्यापनाची चार वैशिष्ट्ये लिहा.
18. पारंपारिक पद्धत आणि समावेशक पद्धतीमधील फरक लिहा.

## भाग - III

खालील प्रत्येक प्रश्नाला पर्यायो प्रश्न दिलेला आहे. त्यापैकी (a) किंवा (b) याचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये : $8 \times 5 = 40$

19. a) शाळा समुदाय संबंध जोडणे सहज घडून येत नाहीत. शिक्षकामध्ये याच्यासाठी उत्तम संपर्क आणि आंतर व्यक्ती कौशल्ये असावी लागतात. विधानाचे विश्लेषण करा.

**किंवा**

   b) सत्य शिक्षण ही मानवी व्यक्तीमत्वात बौद्धिक, शारीरिक, भावनिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक यासारख्या सर्व परिणामांच्या विकासाची प्रक्रिया आहे. या विधानाचे स्पष्टीकरण करा.

20. a) बालकाच्या सामाजिकरणामध्ये शाळा आणि समुदाय यांच्या भूमिकेचे थोडक्यात वर्णन करा.

**किंवा**

b) सकारात्मक तारतम्य व्यक्तीत्व संपादन करणे हा समाज अध्ययनाचा हेतू ( ध्येय ) आहे. याचे वर्णन करा.

21. a) ''तारुण्यावस्था हा ध्येयवाद आणि पूर्वीचे वय यांचा कालावधी आहे.'' याचे विश्लेषण करा.

**किंवा**

b) ''चुका या मुलांच्या विचारांच्या खिडक्या आहेत.'' स्पष्ट करा.

22. a) ''वेगवेगळ्या अध्ययन कर्त्याचा अध्ययन वेग वेगवेगळा असतो.'' याचे वर्णन करा.

**किंवा**

b) चिन्हात्मक नाटक आणि नाटकी खेळ यामधील फरक लिहा.

23. a) समावेशाला ( Inclusion ) कोणते शैक्षणिक अडथळे आहेत आणि समावेशासाठी तुम्ही हे अडथळे कसे दूर कराल ?

**किंवा**

b) समावेशातील ( Inclusion ) भौतिक अडथळे दूर करण्यासाठी वापरलेल्या कोणत्याही पाच उपायांची यादी करा.

24. a) बहू श्रेणी ठरविण्यात शिक्षका समोर येणारी कोणतीही पाच आवाहने कोणती ? त्यांचे वर्णन करा.

**किंवा**

b) बालकाच्या सामाजिक विकासामधील खेळाच्या कार्याचे वर्णन करा.

25. a) ''शाळा ही प्रत्येक बालकाला शैक्षणिक अनुभवांची रचना पुरविणारी औपचारिक प्रक्रिया आहे.'' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

b) ''शिक्षक ही शाळा प्रक्रिया जोडणारी महत्वाची कडी आणि अधोरेखित सरावाची गरज आहे.'' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

26. a) आरक्षण धोरणाचे चार फायदे लिहा आणि कोणत्याही दोनांचे वर्णन करा.

**किंवा**

b) सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या चार वैशिष्ट्यांचो यादी करा आणि कोणत्याहो दोनांचे वर्णन करा.